<u>प्रेसनोट</u>

दि.१९/०२/२०२२

## बंडगार्डन वाहतूक विभाग, पुणे शहर येथील पोलीस शिपायावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. १६/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३७ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – दिलीप दत्तू फुंदे, वय - ३४ वर्षे<br>पद - पोलीस शिपाई, नेमणुक - बंडगार्डन वाहतूक विभाग, पुणे शहर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७,०००/- ( सात हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- १८/०२/२०२२.
ठिकाण :- बंडगार्डन वाहतूक विभाग, पुणे शहर.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे ताब्यातील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे जिनेओ मालवाहू गाडी ही इन्शुरन्स नसल्याने व रजिस्ट्रेशन संपल्याने बंडगार्डन वाहतूक विभाग, पुणे शहर या ठिकाणी थांबवून ठेवली होती. सदरचे वाहन आरटीओकडे न पाठविण्यासाठी लोकसेवक पोलीस शिपाई फुंदे यानी सात हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे ताब्यातील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे जिनेओ मालवाहू गाडी ही इन्शुरन्स नसल्याने व रजिस्ट्रेशन संपल्याने बंडगार्डन वाहतूक विभाग, पुणे शहर या ठिकाणी थांबवून ठेवलेले वाहन आरटीओकडे न पाठविण्यासाठी आरोपी लोकसेवक यानी तडजोडीअंती ५ हजार रूपये लाच मागणी करून स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.